जनसेवा हीच ईश्वरसेवा- सुधीर मुनगंटीवार

12 हृदयविकार बालकांची मुंबईत होणार शस्त्रक्रिया

जनसेवा हीच  ईश्वरसेवा मानुन सातत्याने आरोग्य शिबीरांच्या माध्यमातून रुग्णांना आवश्यक ती सेवा पोहोचविण्याचे समाजोपयोगी कार्य वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री श्री सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने होत आहे.

श्री माता कन्यका सेवा संस्था, चंद्रपूर यांच्या व्दारा आयोजित, श्री. सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रेरणेतून व मुंबईच्या मुलुंड येथील फोर्टीस हॉस्पीटलशी करार करुन बालकांसाठी हृदयरोग तपासणी शिबीर घेण्यात आले होते. त्यातील 20 बालकांवर मुंबई येथे केंद्र सरकारच्या सहकार्याने मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. त्यातील सर्वच बालके सुखरुपपणे आपल्या घरी पोहचली आहे.

आता दुस-या टप्प्यामध्ये चंद्रपूर येथून दि. 21 सप्टेंबर 2022 रोजी एकुण 12 बालकांना त्यांच्या पालकांसह मुंबई येथील मुलुंडच्या फोर्टीस हॉस्पीटलमध्ये पाठविण्यात येत आहे. तेथे त्यांच्यावर तज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली हृदयविकाराची यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

सामान्य  नागरिकांची सेवा हेच पुण्यसंचित तुम्हाला समाधान देत याची नम्र जाणीव आहे. हे ध्यानात घेऊन श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी शस्त्रक्रियेला जाणा-या बालकांना शुभेच्छा दिल्या आहे. मुंबईतील शस्त्रक्रियेसाठी सागर खडसे, राजेश सुरावार व शैलेंद्रसिंह बैस  यांची मदत होणार आहे.